आवृत्ती -२

सत्यमेव जयते

# उमेदवार व राजकीय पक्ष यांच्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र माहितीपुस्तिका

## जानेवारी २०२४

भारत निवडणूक आयोग
ELECTION COMMISSION OF INDIA

भारत निवडणूक आयोग
निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

# उमेदवार व राजकीय पक्ष यांच्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र माहितीपुस्तिका
# जानेवारी २०२४

**भारत निवडणूक आयोग**
निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१
दस्तऐवज क्रमांक : ३२४. ६ ईपीएस. : एसओपी :०१४:२०२३

शीघ्र डाकेने/ई-मेलद्वारे

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

---

क्र. ५१/८/अनुदेश/२०२३-ईएमएस | दिनांक २४ जानेवारी २०२४

प्रति,

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे,मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** उमेदवार व राजकीय पक्ष यांकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र यावरील माहितीपुस्तिका संबंधी.

महोदय/महोदया,

मला, यसोबत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांच्या वापराबाबत उमेदवार व राजकीय पक्ष यांच्यासाठीची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र माहितीपुस्तिका अग्रेषित करण्याचा निदेश आहे. म्हणून त्यासाठी आवश्यक असल्यास, या माहितीपुस्तिका स्थानिक भाषेत (भाषांमध्ये) भाषांतर करून घेण्याची विनंती करण्यात येत आहे. सर्व मान्यताप्राप्त राज्य या माहितीपुस्तकाच्या पुरेशा प्रती मुद्रित करण्यात याव्यात आणि व राष्ट्रीय राजकीय पक्षांना आणि नामनिर्देशनानंतर सर्व निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना वितरित करण्यात याव्यात.

उक्त माहितीपुस्तिका, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावरदेखील अपलोड करण्यात येईल.

आपला विश्वासू,

सही/—

**(राकेश कुमार),**

अवर सचिव.

सहपत्र : ए/ए




**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी** यांची निर्मिती मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (संरक्षण मंत्रालयाचा एक सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) आणि मेसर्स भारतीय इलेक्ट्रॉनिक्स कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (अणु उर्जा विभागाचा एक सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) यांनी केली आहे.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) :** इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे, नियंत्रण युनिट (सीयू) व मतदान युनिट (बीयू) या दोन युनिटांनी मिळून बनते. एका मतदान युनिटामध्ये १६ उमेदवारांच्या नावांची सोय असते. ३८४ उमेदवारांचा (नोटासह) अंतर्भाव (समावेश) करण्यासाठी २४ (चोवीस) मतदान युनिटे एका क्रमाने नियंत्रण युनिटाला एकत्र जोडली जाऊ शकतात. दृष्टिदोष असलेल्या मतदारांच्या सोयीसाठी मतदान युनिटच्या उजव्या बाजूस, उमेदवारांच्या मतदान बटनाच्या उजवीकडे ब्रेल लिपीमध्ये १ ते १६ अंक दिलेले असतात. ते (ईव्हीएम) ७.५ व्होल्ट क्षमतेच्या ऊर्जा संचावर (बॅटरी) चालते.

**मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपीएटी) :** मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपीएटी) हे यंत्र इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांना जोडण्यात आलेली एक स्वतंत्र अशी यंत्रणा आहे, ज्यामुळे मतदारांना त्यांचे मत त्यांनी दिलेल्या मतदारालाच दिले गेले आहे की नाही हे पडताळून पाहता येते. व्हीव्हीपीएटी २२.५ व्होल्टच्या ऊर्जा संचावर (बॅटरीवर) चालते.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांचे कार्यान्वयन**



**नियंत्रण युनिट :**—नियंत्रण युनिट मतदान केंद्राध्याकडे/ मतदान अधिकाऱ्याकडे ठेवण्यात येते आणि मतदान युनिट व व्हीव्हीपीएटी हे मतदान कक्षात ठेवण्यात येतात.

- जेव्हा, मतदान युनिटवरील त्याच्या/तिच्या पसंतीच्या उमेदवाराचे बटन (निळे बटन) दाबून मतदान केले जाते, तेव्हा त्या विशिष्ट उमेदवाराच्या बटनासमोरील **लाल दिवा** पेटतो.







▶ दुसऱ्या बाजुस, व्हीव्हीपीएटी मुद्रकामध्ये उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव व चिन्ह असलेली एक चिठ्ठी मुद्रित केली जाते आणि ती यंत्रणेच्या पारदर्शक चौकटीत ७ **सेकंदासाठी** दृश्यमान राहते.

▶ त्यानंतर, ही मुद्रित चिठ्ठी आपोआप कापली जाते आणि व्हीव्हीपीएटी च्या मोहोरबंद केलेल्या संकलन पेटीत (ड्रॉप बॉक्समध्ये) पडते.



▶ त्यानंतर नियंत्रण युनिटमधून यशस्वीपणे मत नोंदविण्यात आले आहे, याची खात्री दर्शविणारा 'बीपचा' आवाज ऐकू येतो.

| वैशिष्ट्ये | उद्देश | नियमबाह्य ठरवणे |
|---|---|---|
| स्वयंसिद्ध यंत्रणा | आयोगाद्वारे वापरण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे, नेटवर्क नसलेली एक स्वयंसिद्ध यंत्रणा आहे, जी फक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या अंगभूत भागांना (उदा. नियंत्रण युनिट, मतदान युनिट, व्हीव्हीपीएटी, एसएलयु, पी-एफएलसीयू) जोडले जाऊ शकते. | वायरमार्फत किंवा वायरविरहित बाह्य जगत कोणतीही जोडणी. |
| एकाचवेळी वापरण्यात येणारी प्रक्रिया योजक (ओटीपी) झिलपी (चीप) | हे यंत्र, कोणत्याही प्रकारच्या छेडछाडीस/ फेरफारास प्रतिबंध करण्यासाठी इलेक्ट्रॉनिकरीत्या संरक्षित केलेले आहे. या यंत्रामध्ये वापरलेली संगणक आज्ञावली ही, नष्ट होणारी एकावेळीच प्रक्रियायोजक (ओटीपी) झिलपी (चीप) आहे. जेणेकरून त्यात फेरफार करणे किंवा त्यासोबत छेडछाड करणे शक्य होणार नाही. | कोणताही फेरफार किंवा छेडछाड |
| अनधिकृत प्रवेश रोखणारा घटक (यूएडीएम) | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटच्या सूक्ष्म नियंत्रकामध्ये आज्ञावली तसेच मतदान झालेली माहिती साठवण्यात येते, जी सुरक्षित घटकांद्वारे संरक्षित केलेली जाते. यंत्र चालू असो अथवा बंद कोणत्याही वेळी सुरक्षित घटक उघडण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास, हे यंत्र त्याच्या मूळ स्थितीत (फॅक्टरी मोड) जाते आणि ते बंद पडते. | सूक्ष्म नियंत्रकामध्ये किंवा स्मृतीमधील कोणत्याही प्रवेश. |
| कोणतीही रेडिओ वारंवारता पाठवण्याची किंवा ग्रहण करण्याची क्षमता नाही. | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास कोणतीही रेडिओ वारंवारता (आरएफ) संदेशवहन क्षमता नसल्यामुळे बिनतारी, ब्ल्युटुथ किंवा वायफाय यांद्वारे सिग्नल कोडींग करून, त्याद्वारे भारत निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची छेडछाड करण्यास प्रतिबंध आहे. म्हणून, वायफाय ब्ल्यूटुथ इत्यादींमार्फत संदेशवहन होणे शक्य नाही. | ब्ल्युटुथ किंवा वायफाय यांसारख्या बिनतारी कोडींग सिग्नलद्वारे कोणतीही छेडछाड. |
| कळ दाबून गतिकीय संकेतन (कोडींग) | प्रत्येक कळ दाबण्याचे गतिकीय पद्धतीने संकेतन (कोडींग) केलेले आहे. म्हणून नियंत्रण युनिट व मतदान युनिट यांमधील संकेतांचे (सिग्नल्स) निःसंकेतन (डीककोडींग) करणे कोणालाही शक्य होणार नाही. | नियंत्रण युनिट, मतदान युनिट व व्हीव्हीपीएटी यांमधील संकेतांचे (सिग्नल्स) कोणतेही निःसंकेतन करणे. |
| मजबूत परस्पर अधिप्रमाणन क्षमता. | कोणतेही अनधिकृत साधन, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत आंतर परस्पर क्रिया करणे शक्य नाही, याची मजबूत परस्पर अधिप्रमाणन क्षमतेमुळे याची खात्री घेते. | कोणत्याही अनधिकृत साधनांद्वारे कोणतीही आंतपरपस्पर क्रिया करणे. |
| कळ दाबण्याचा दिनांक व वेळ यांसाठी वास्तव कालदर्शक घड्याळ. | अधिकृत किंवा अनधिकृत अशी प्रत्येक कळ दाबल्याचा वास्तव दिनांक व वेळेसह नोंद होते. | कोणताही गैरव्यवहार. |

**राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या व उमेदवारांच्या प्रतिनिधींचा अंतर्भाव करून, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपीएटीशी संबंधीत विविध कार्ये पुढीलप्रमाणे पार पाडली जातील :—**

**निवडणूक नसतानाच्या कालावधीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची आणि व्हीव्हीपीएटींची साठवणूक.**

- सर्वसाधारणपणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्हीव्हीपीएटी यांची जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या अभिरक्षेखाली जिल्हा मुख्यालयात साठवणूक करण्यात येते.

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्हीव्हीपीएटी यांची दुहेरी कुलुप पद्धतीनुसार साठवणूक करण्यात येते. कुलुप-१२ च्या सर्व चाव्या जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे असतील आणि कुलुप-२ च्या सर्व चाव्या उपजिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे किंवा समकक्ष अधिकाऱ्याकडे असतील.

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्हीव्हीपीएटी गोदामाच्या /सुरक्षित कक्षाच्या किमान १/२ विभागात, सशस्त्र सुरक्षा, सीसीटीव्ही अंतर्गत निगराणी नोंदवही इत्यादी असेल.

- निवडणूक नसतानाचा कालावधी, ते निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम होईपर्यंतच्या कालावधीत, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्हीव्हीपीएटी गोदामे, (ने-आण, तपासणी इ. सारख्या कोणत्याही प्रयोजनासाठी राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये उघडण्यात / बंद करण्यात येतील.

- निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम करण्याबरोबर उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-व्हीव्हीपीएटी गोदाम/सुरक्षित कक्ष उघडताना व बंद करत असताना, सहभागी करून घेण्यात येईल.

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-गोदाम/सुरक्षित कक्ष ध्वनिचित्रमुद्रणांतर्गत उघडण्यात व बंद करण्यात येईल.

- निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम करण्याबरोबर उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-व्हीव्हीपीएटीसाठीचे गोदाम/सुरक्षित कक्ष उघडताना व बंद करताना समाविष्ट करण्यात येईल.

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र गोदाम/सुरक्षित कक्ष ध्वनिचित्रमुद्रणाखाली उघडण्यात आणि बंद करण्यात येईल.

► **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांची प्रथमस्तरीय (एफएलसी) तपासणी**

- प्रत्येक निवडणूक घेण्यापूर्वी, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (ईसीआयएल) यांच्या अधिकृत अभियंत्याकडून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची प्रथम स्तरीय तपासणी जिल्हा निवडणूक अधिकारी स्तरावर करण्यात येईल.

- या प्रयोजनासाठी, प्रथमस्तरीय तपासणी सुरू करण्यापूर्वी किमान दोन दिवस अगोदर, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे लेखी स्वरुपात राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना जिल्हा मुख्यालयात निमंत्रित करण्यात येईल. आणि त्याची प्रत राज्य मुख्यालयात पृष्ठांकित करण्यात येईल.

- राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना, संपूर्ण प्रथमस्तरीय तपासणीचे अवेक्षण करण्यासाठी आणि कागदी मोहोरेवर (नियंत्रण युनिटवर लावलेली गुलाबी कागदी मोहोर) आणि प्रथमस्तरीय तपासणीशी संबंधित विविध कागदपत्रांवर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी देखील समाविष्ट करण्यात येईल.

- प्रथमस्तरीय तपासणी पूर्व युनिटचा (पीएफएलसीयू) वापर करून, प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी याची कार्यक्षमता तपासणी करण्यात येईल.

- चिन्ह भरणाऱ्या युनिटचा (एसएलयू) वापर करून, प्रत्येक व्हीव्हीपीएटीमध्ये डमी चिन्हे भरण्यात येतात. व्हीव्हीपीएटीमध्ये भरण्यात येणारी चिन्हे, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना पाहण्यासाठी मॉनिटर/दूरदर्शन पटलावर त्याचवेळी प्रदर्शित करण्यात येतात.

• प्रथमस्तरीय तपासणीदरम्यान, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा कोणताही घटक बनावट नाही, हे तपासण्यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे खण (कॅबिनेट) उघडे ठेवावेत. तसेच प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोरील बटनास ६ मते (म्हणजेच, एकूण ९६ मते) देऊन निकालाचे निरीक्षण करण्यात यावे आणि प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी मधील अभिरूप मतदानाची माहिती पुसून टाकावी.

• तसेच, ५० टक्के इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादृच्छिकपणे निवड करून १% इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये १२०० मते, २% इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये १००० मते आणि २% इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये ५०० मते उच्चतम अभिरूप मतदान घेण्यात यावे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या इलेक्ट्रॉनिक निकालाचा, व्हीव्हीपीएटी चिठ्ठयांच्या मोजणीशी मेळ बसवण्यात यावा. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना यादृच्छिकपणे ५ टक्के इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी निवडण्यास आणि अभिरूप मतदान करण्यास देखील मुभा आहे.

• प्रथमस्तरीय तपासणी-योग्य असलेल्या यंत्रावर हिरव्या रंगाचे स्टिकर चिटकवण्यात यावे आणि प्रथमस्तरीय तपासणीत नाकारण्यात आलेल्या यंत्रावर लाल रंगाचे स्टिकर चिटकवण्यात यावे.

- प्रथमस्तरीय तपासणी-योग्य असलेल्या आणि प्रथमस्तरीय तापसणीत-नाकरण्यात आलेल्या यंत्राची स्थिती, भ्रमणध्वनी उपयोजकाचा वापर करून, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्यवस्थापन प्रणालीमध्ये (ईएमएस) अद्ययावत करण्यात यावी.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व्यवस्थापन प्रणालीमध्ये (ईएमएस) निर्मित प्रथमस्तरीय तपासणी-योग्य असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी, सर्व राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना देण्यात यावी.
- प्रथमस्तरीय तपासणीदरम्यान राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मोहोरांवर, नमुना नोंदवहीवर स्वाक्षरी करण्याची मुभा आहे.
- प्रथमस्तरीय तपासणीत नाकरण्यात आलेली यंत्रे दुरुस्तीसाठी निर्माणकाकडे पाठवण्यात यावीत.
- प्रथमस्तरीय तपासणी योग्य असलेली यंत्रे ही, दुहेरी कुलुप असलेल्या, सीसीटीव्ही व्याप्ती असलेल्या आणि किमान १ सेक्शन सशस्त्र सुरक्षा असलेल्या सुरक्षित कक्षामध्ये ठेवावीत.

► **प्रशिक्षण व जन-जागृती यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी.**

- प्रथमरस्तीय तपासणी पूर्ण झाल्यानंतर, राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत जागरूकता व प्रशिक्षण या प्रयोजनासाठी १० टक्के पर्यंत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी बाहेर काढण्यात यावीत.
- जागरूकता व प्रशिक्षण यांसाठीची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना देण्यात यावी.
- प्रशिक्षण व जागरूकता यासाठी घेतलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी स्वतंत्रपणे िनियुक्त करण्यात आलेल्या वेगळ्या गोदामात ठेवावीत.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रात्यक्षिक केंद्रे (ईटीसी), जिल्हा निवडणूक कार्यालयात तसेच निवडणूक निर्णय अधिकारी मुख्यालयात/उप-विभागीय महसूल कार्यालयात निवडणूका जाहीर होईपर्यंत सुरू करण्यात यावीत.
- सर्व मतदान ठिकाणे/निवडणूक साक्षरता मंडळे यांना समाविष्ट करून घेण्यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी/ निर्वाचन प्रभागासाठी फिरते प्रात्याक्षिक वाहन तैनात करण्यात येते.
- पुन्हा नव्याने केलेल्य प्रथमस्तरीय तपासणीनंतर, यादृच्छिकीकरण व कार्यान्वयन आवश्यक असल्यास, प्रशिक्षण व जागरूकता करिताची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी निवडणुकीसाठी दाखल करण्यात येतील.

► **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांचे यादृच्छिकीकरण**

- भारत निवडणूक आयोगाद्वारे विकसित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्यवस्थापन प्रणालीचा (ईएमएस) वापर करून, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांचे यादृच्छिकीकरण करण्यात येते.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांचे प्रथम यादृच्छिकीकरण, राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उपस्थितीत विधानसभा मतदारसंघनिहाय/प्रभागक्षेत्र निहाय ईलेक्ट्रॉनित मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटींचे वाटप करण्यासाठी करण्यात येते.

- प्रथम यादृच्छिकीकरण झालेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी (विधानसभा मतदारसंघनिहाय/ विभानसभा प्रभागक्षेत्रनिहाय) राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना देण्यात येते.
- निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर, यादृच्छिकीकरण झालेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी (विधानसभा मतदारसंघनिहाय/विधानसभा प्रभागक्षेत्रनिहाय) निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना देखील देणयात येते.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांचे दुसरे यादृच्छिकीकरण, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी सुरू करण्यापूर्वी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या उपस्थितीत, मतदान केंद्रनिहाय वाटप करण्यासाठी आणि यंत्रे राखीव ठेवण्यासाठी करण्यात येते.
- दुसरे यादृच्छिकीकरण झालेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना देण्यात येते.

▶ **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हव्हीपीएटी कार्यान्वित करणे**

- मतदानात वापरण्यासाठीची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या उपस्थितीत जिल्हा कर्मचाऱ्याद्वारे कार्यान्वित क्रियान्वित करण्यात येतात.
- कार्यान्वित करण्याच्या दिवशी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटीचा सुरक्षित कक्ष, ध्वनिचित्रमुद्रणाखाली (व्हिडिओग्राफी) उमेदवारांच्या/त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येतो.
- प्रत्येक व्हीव्हीपीएटी मध्ये चिन्हांकन भरण युनिटद्वारे (सिम्बॉल लोडींग युनिटद्वारे) (एसएलयु) चिन्हांचा अंतर्भाव करण्यात येईल. व्हीव्हीपीएटीमध्ये अंतर्भूत केलेली चिन्हे, उमेदवारांना/त्यांच्या प्रतिनिधींना मॉनिटर/टी.व्ही. पडद्यावर पहाता यावीत यासाठी एकाचवेळी प्रदर्शित करण्यात येतील.
- प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी मतदानासाठी वापरताना त्यांची, नोटासह सर्व उमेदवारांना एकेक मत देऊन तपासणी केलेली आहे.
- त्याबरोबरच, यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच टक्के इव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीचे एक हजार मतांचे उच्चस्तरीय अभिरुप मतदान केले असून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा इलेक्ट्रॉनिक निकाल व्हीव्हीपीएटीच्या चिठ्ठ्यांच्या संख्येशी मिळताजुळता आहे.
- उमेदवारांना त्यांच्या प्रतिनीधींनाही, पाच टक्के ईव्हीएम व व्हीव्हीपीएटी यंत्रे यादृच्छिकपणे निवडण्यास आणि अभिरूप मतदानात मतदान करण्यास परवानी देण्यात आली आहे.
- मतदान केंद्रात नेमुन दिलेले कोणतेही ईव्हीएम-व्हीव्हीपीएटी मतदानादरम्यान सुरळीतपणे चालत नसल्याचे आढळून आल्यास, त्याच्या बदली राखीव साठ्यातील यंत्र आणून बसविले जाईल.
- ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करण्यासाठी वापरावयाच्या मोहोरांवर स्वाक्षरी करण्यास उमेदवार/त्यांच्या प्रतिनिधींना परवानगी देण्यात आलेली आहे.
- ईव्हीएम-व्हीव्हीपीएटी कार्यान्वित केल्यानंतर, उमेदावर/त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत दुहेरी कुलुप वापरून ईव्हीएम-व्हीव्हीपीएटी सुरक्षित कक्षात ठेवण्यात आलेले आहेत.



▶ **मतदान संचलन पथकांना ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी यंत्रांचे वाटप करणे**

- ईव्हीएम-व्हीव्हीपीएटी यंत्र वाटपाच्या दिवशी, सुरक्षित कक्ष उमेदवारांच्या/त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीडीओचित्रणांतर्गत उघडण्यात आला आहे.
- ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी यंत्रांचे वितरण, उमेदवारांच्या/त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.
- वितरणाच्या वेळी कोणतेही ईव्हीएम-व्हीव्हीपीएटी चालत नसल्याचे आढळून आल्यास, त्याच्या बदली राखीव साठ्यातून ईव्हीएम/व्हीव्हीपीएटी आणून ते बदलण्यात आले आहे.

▶ **मतदानाचा दिवस**

- मतदानाच्या दिवशी, प्रत्यक्ष मतदान सुरू होण्याच्या वेळेपासून ९० मिनिटेअगोदर, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत प्रत्येक मतदान केंद्रात किमान ५० मतांचे अभिरूप मतदान (नोटासह, प्रत्येक उमेदवाराला किमान १ मत देऊन) घेण्यात येईल. अभिरूप मतदानाचा इलेक्ट्रॉनिक निकाल व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांच्या संख्येशी मिळता-जुळता आहे हे ताडून बघण्यात येईल.
- नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाच्या सर्व माहितीसाठा नष्ट करण्यात येईल आणि अभिरूप मतदानातील व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या काळ्या लिफाफ्यामध्ये ठेवण्यात येईल आणि तो गुलाबी कागदी मोहरेने मोहोरबंद करण्यात येईल.
- मतदान केंद्राध्यक्ष तशा आशयाचे अभिरुप मतदान प्रमाणपत्र तयार करील.
- प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी, नियंत्रण युनिट हे हिरवी कागदी मोहोर, विशेष खूणचिठ्ठी आणि निर्देश खूणचिठ्ठी यांद्वारे मोहोरबंद करण्यात येईल. व्हीव्हीपीएटी ड्रॉप बॉक्ससुद्धा (मतदान कक्ष) पत्ता खूणचिठ्ठीने (ॲड्रेस टॅग) मोहोरबंद करण्यात येईल.
- मतदान समाप्त झाल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष मतदान समाप्त करण्यासाठी नियंत्रण युनिटचे " CLOSE " बटन दाबील. व्हीव्हीपीएटीमधून बॅटरी काढून ठेवली जाईल. ईव्हीएम / व्हीव्हीपीएटी त्या त्या वहन पेट्यांमध्ये ठेवण्यात येतील. आणि ते निर्देश खूणचिठ्ठीने मोहोरबंद करण्यात येतील.
- ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करण्यासाठी वापरलेल्या मोहोरांवर (मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी आणि मतदान समाप्तीच्या वेळी) स्वाक्षरी करण्याची मतदान प्रतिनिधींना परवानगी देण्यात यावी.
- निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतदान प्रतिनिधींना, मतदान प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी मतदान केंद्रामध्येच उपस्थित राहण्याची परवानगी देलेली आहे.
- मतदारांचा तपशील, ईव्हीएम - व्हीव्हीपीएटी आणि वापरलेल्या मोहोरा, ईव्हीएममध्ये नोंदवलेल्या मतांसह, इत्यादींचा तपशील असणाऱ्या नमुना १७ सी ची प्रत मतदान प्रतिनिधींना दिला आहे.

▶ **मतदान नोंदवलेली ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची मतदान केंद्रापासून ते संकलन केंद्रापर्यंतची वाहतूक**

- मतदान संपल्यानंतर, ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी, सुरक्षा व्यवस्थेत मतदान केंद्रावरून संकलन केंद्रापर्यंत नेले आहेत.
- मतदान नोंदवलेले ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी घेऊन जाणाऱ्या वाहनांमागे उमेदवार/मतदान प्रतिनिधींना येण्याची परवानगी देण्यात आली आहे.

▶ **मतदानानंतर इव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची साठवणूक**

- मतदान केलेले ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी उमेदवार/त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सुरक्षा कक्षामध्ये ठेवले आहे.
- सुरक्षा कक्षाच्या कुलुपांवर उमेदवार/त्यांच्या प्रतिनिधींनादेखील त्यांची मोहोर लावण्याची परवानगी दिली आहे.
- मतदान नोंदवलेली ईव्हीएम ठेवलेल्या सुरक्षाकक्षाच्या ठिकाणी किमान १ सशस्त्र सुरक्षा तुकडी (केंद्रीय सशस्त्र पोलीस दल) तैनात केली आहे आणि सीसीटीव्ही चित्रणाची तरतूद केली आहे.

- मतदान केलेले ईव्हीएम साठविलेल्या सुरक्षाकक्षाच्या ठिकाणी द्विस्तरीय सुरक्षा कडे उभारलेले आहे. पहिल्या कड्यात केंद्रीय सशस्त्र पोलीस दल तैनात आहे आणि बाहेरच्या कड्यात राज्य सशस्त्र पोलीस तैनात आहेत. आतील कड्यात कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.
- सुरक्षा कक्षात पहारा करण्यासाठी तेथे उमेदवारांचा/त्यांच्या प्रतिनिधींना राहण्याची परवानगी दिली आहे. सुरक्षा कक्षाचे प्रवेशद्वार दिसत नसल्यास, सीसीटीव्ही दर्शक पटल सुविधेची तरतूद केली आहे. मतदान न नोंदवलेली कार्यान्वित न केलेली आणि न वापरलेली राखीव ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी, स्वतंत्रपणे सुरक्षेत ठेवली आहेत.

▶ **मतमोजणीचा दिवस**

- मतदाने नोंदविलेली यंत्रे ठेवलेले सुरक्षित कक्ष, मतमोजणीच्या दिवशी उमेदवार/त्यांचे प्रतिनिधी, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक आयोग निरीक्षक यांच्या उपस्थितित, व्हिडीओचित्रणाखाली उघडले आहे.
- उमेदवार आणि त्यांनी नेमलेले मतमोजणी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत मतमोजणी केली आहे.
- मतमोजणीच्या दिवशी, ईव्हीएमचे नियंत्रण युनिट सीसीटीव्ही चित्रणात सुरक्षित कक्षामधून मतमोजणी टेबलावर आलेली आहे आणि उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांनी मोहोरेची पडताळणी केल्यानंतर नियंत्रण युनिटावरील 'रिझल्ट' RESULT बटण दाबून नियंत्रण युनिटच्या (सीयू) च्या दर्शक पटलावर (डीस्प्लेवर) निकाल दाखविला आहे.
- मतमोजणी पर्यवेक्षकांनी ईव्हीएम निहाय निकाल नमुना १७सी मध्ये नोंदवला आहे आणि तो फेरीनिहाय निकाल संकलित करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठविला आहे.
- मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक विधानसभा मतदारसंघ/मतदासंघातील यादृच्छिकपणे निवडलेल्या ५ मतदान केंद्राच्या व्हीव्हीपीएटी चिठ्ठीची अनिवार्य पडताळणी केली आहे.
- मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, नियंत्रण युनिटमधून पॉवर पॅक (बॅटरी) काढून घेतला आहे आणि नियंत्रण युनिट, त्यांच्या वहनपेटीमध्ये मोहोरबंद केले आहे.
- सर्व व्हीव्हीपीएटी मधून व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या काढून त्या सीसीटीव्ही चित्रणात मोहोरबंद लिफाफ्यात व्हीव्हीपीएटी निहाय ठेवल्या आहेत.
- त्यानंतर, ईव्हीएम सुरक्षित कक्षामध्ये ईव्हीएम ठेवले आहेत आणि व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांचे मोहोरबंद लिफाफे सांविधिक लिफाफ्यामधून स्वतंत्र ट्रंकमध्ये ठेवले आहेत.
- उमेदवार/त्यांच्या प्रतिनिधींना मोहोरांवर स्वाक्षरी करण्याची परवानगी दिली आहे.

**टीप.**—ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी वरील तांत्रिक वैशिष्ट्ये आणि प्रशासकीय प्रक्रियेबद्दलच्या तपशीलासाठी कृपया भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले ईव्हीएम सादरीकरण, ईव्हीएम वरील अद्यावयावत सूचनापत्र (स्टेटस पेपर) आणि ईव्हीएमवरील नियमावली पहावी.



इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटीचा वापर करून
आपण मतदान कसे करावे
1
बुथमध्ये प्रवेश करा
आपण मतदान कक्षात प्रवेश करत असताना मतदान केंद्राध्यक्ष मतदान युनिट कार्यक्षम करील
2
आपले मतदान
तुमच्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावा/चिन्हासमोरील मतदान युनिटवरील निळे बटन दाबा.
3
दिवा पहा
निवडलेल्या उमेदवाराच्या नाव/चिन्हासमोरील लाल दिवा प्रकाशमान होईल
4
मुद्रीत चिठ्ठी पहा
मुद्रक, दर्शविल्याप्रमाणे निवडलेल्या उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव व चिन्हे असलेली मतदान चिठ्ठी मुद्रीत करील
मुद्रित चिठ्ठी तुम्हाला देण्यात येणार नसल्यामुळे काचेतून मुद्रित चिठ्ठी पहा.
टीप
जर तुम्हाला मतदान चिठ्ठी पडताना दिसली नाही आणि बटण दावल्यावर मोठा आवाज (बीपध्वनी) ऐकू आला नाही, तर कृपया मतदान केंद्राध्यक्षाशी संपर्क करा
भारत निवडणूक आयोग
Election Commission of India